क्रमांक- एमआयएस-०६१६/सीआर ५५/२०१६/तीन

विषय: कर सहायक परीक्षा २०१६ मध्ये गैरप्रकाराच्या प्रयत्नाबाबत.

आयोगामार्फत दिनांक २८ ऑगस्ट, २०१६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या **कर सहायक परीक्षा २०१६** मध्ये काही उमेदवारांकडून झालेल्या गैरप्रकाराच्या प्रयत्नांमुळे सामुहिक पेपर फुटी झाली आहे व त्यामुळे सर्व उमेदवारांची पुन्हा फेरपरीक्षा घेण्यात यावी, अशा आशयाची काही निवेदने आयोगाकडे प्राप्त झाली आहेत.

**२.** यासंदर्भात स्पष्ट करण्यात येते की, विषयांकित परीक्षेमध्ये काही व्यक्तींकडून हायटेक तंत्रज्ञानाचा वापर करुन व्यक्तीगतरित्या गैरप्रकार करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. अशा गैरप्रकाराचा प्रयत्न करणा-या उमेदवारांवर परीक्षेच्या दिवशीच कायदेशीर कारवाई करुन संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून पोलीस तपास सुरु आहे. सदर परीक्षेत पेपर फुटण्याची बाब समोर आलेली नाही. त्यामुळे सदर परीक्षा रद्द करण्याबाबत किंवा फेरपरीक्षा घेण्याबाबत कोणताही प्रस्ताव आयोगाच्या विचाराधीन नाही.

**३.** कॉपीचा/गैरप्रकाराचा प्रयत्न करणा-या घटनांची आयोगाने गंभीर दखल घेतलेली असून अशा उमेदवारांवर प्रशासकीय व फौजदारी अशा दोन्ही स्वरुपाची कारवाई करण्यात आली/येत आहे.

ठिकाण:-मुंबई.
दिनांक :- २२ सप्टेंबर, २०१६

प्रदीप कुमार
सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग